# Maharashtra Board Class 10 Sanskrit Anand Notes Chapter 3 सूक्तिसुधा

## सूक्तिसुधा Summary in Marathi

प्रस्तावना :

“सूक्तयः नाम सुवचनानि।” सूक्ती म्हणजे चांगली उक्ती (बोलणे). संस्कृत भाषा अशा अनेक सुवचनांनी समृद्ध आहे. सुभाषितांचा संदर्भ लक्षात घेऊन सूक्तींचा अर्थ जाणून घेतल्यास नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व विकसित केले जाऊ शकते.

पुष्कळदा, अनेक संस्कृत सूक्ती इतर भारतीय भाषांमध्ये सुध्दा वापरलेल्या दिसून येतात. प्रत्यक्षात, अशा सूक्तींचे स्मरण केल्याने व्यक्तीची शब्दसंपदा वाढते व इतर भाषांवर प्रभुत्व निर्माण होते.

श्लोकः 1

विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनम्
विद्या भोगकरी यश:सुखकरी विद्या गुरूणां गुरुः।
विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्
विद्या राजमु पूज्यते न तु धनं विद्याविहीन: पशुः ।।1।। (वृत्तम् – शार्दूलविक्रीडितम्, स्रोत: – नीतिशतकम्)

सन्धिविग्रहः

1. रूपमधिकम् – रूपम् + अधिकम्।
2. बन्धुजनो विदेशगमने – बन्धुजन: + विदेशगमने।

अन्वय:- विद्या नाम नरस्य अधिकं रूपम्, प्रच्छन्नगुप्तं धनम्, विद्या भोगकरी यश:सुखकरी (च)। विद्या गुरूणां गुरुः । विदेशगमने विद्या बन्धुजनः ।
विद्या पर दैवतम्। विद्या राजसु पूज्यते न तु धनम्। विद्याविहीनः पशुः (एव)।

अनुवादः

मराठी विद्येमुळे मानवाचे सौंदर्य वाढते. विद्या हे संरक्षिलेले गुप्त धन आहे. विद्या नाना भोग (समाधान) प्राप्त करून देणारी आहे. (ती) यश व आनंद मिळवून देणारी आहे. विद्या गुरुंची गुरु आहे. परदेशी गेले असता विद्या ही बांधव असते. (बांधवाप्रमाणे उपयोगी पडते/सहाय्यभूत होते) विद्या सर्वश्रेष्ठ दैवत आहे. विद्या राजांमध्ये (राजसभांमध्ये) पूजनीय आहे; धन नाही. ज्याच्याजवळ विद्या नाही तो पशू(च) (समजावा).

श्लोकः 2

निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु
लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम्।
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा

न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः।।2।। (वृत्तम् – वसन्ततिलका, स्रोतः – नीतिशतकम्)

सन्धिविग्रहः

1. नीतिनिपुणा यदि – नीतिनिपुणाः + यदि।
2. न्याय्यात्पथः – न्याय्यात् + पथः ।

अन्वयः- यदि (अपि) नीतिनिपुणाः निन्दन्तु स्तुवन्तु वा, लक्ष्मी समाविशतु यथेष्ट गच्छतु वा, मरणम् अद्य एव अस्तु युगान्तरे वा, (तथापि) धीराः न्याय्यात् पथः पदं न प्रविचलन्ति।

अनुवादः

नीतिमध्ये कुशल लोक निंदानालस्ती करोत वा प्रशंसा करोत, लक्ष्मी तिच्या इच्छेप्रमाणे येवो अथवा जावो, आजच मरण येवो वा युगान्त झाल्यावर दुसऱ्या युगात / भरपूर काळ लोटल्यावर) येवो, (तरीही) धैर्यवान लोक न्याय्यमार्गावरून आपले पाऊल ढळू देत नाहीत (ते न्याय्यमार्ग सोडत नाहीत).

श्लोकः 3

आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिकाः।
बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधनम् ।।3।। (वृत्तम् – अनुष्टुप, स्रोतः – पञ्चतन्त्रम्)

अनुवादः

मराठी पोपट, साळुक्या (मैना) त्यांच्या स्वतःच्या तोंडाच्या दोषाने (बडबडीमुळे) अडकले जातात. (पण) बगळे (मात्र) अडकत नाहीत. (अशा प्रकारे) मौन पाळणे हे सर्व हेतू (गोष्टी) प्राप्त करण्याचे (मिळविण्याचे) साधन आहे.

श्लोकः 4

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगाः
निरालम्बो मार्गश्चरणविकलः सारथिरपि।
रविर्यात्येवान्तं प्रतिदिनमपारस्य नभसः
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे।।4।। (वृत्तम् – शिखरिणी, स्रोतः – भोजप्रबन्धः)

सन्धिविग्रहः

1. मार्गश्चरणविकलः – मार्गः + चरणविकलः।
2. रवियत्येवान्तम् – रविः + याति + एव + अन्तम्।
3. प्रतिदिनमपारस्य – प्रतिदिनम् + अपारस्य।
4. नोपकरणे – न + उपकरणे।

अन्वयः- रथस्य एकं चक्रं, सप्त भुजगयमिताः तुरगाः, निरालम्बः मार्गः, सारथिः अपि चरणविकलः, (तथापि) रविः प्रतिदिनम् अपारस्य नभसः अन्तं याति एव। महतां क्रियासिद्धिः सत्त्वे भवति, उपकरणे न (भवति)।

अनुवादः

https://www.evidyarthi.in/

सूर्य दररोज, सापांनी नियंत्रित सात घोडे जोडलेल्या, एकच चाक असलेल्या रथातून, निराधार मार्गावरून, पायाने विकलांग अशा सारथीबरोबर अनंत अशा आकाशाच्या शेवटापर्यंत जातो. (जसे) महान लोकांच्या कार्याचे यश त्यांच्यातील सत्त्वाने (सामर्थ्याने) होते. साधनांनी नाही.

श्लोकः 5

अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका।
तृणैर्गुणत्वमापनष्यन्ते मत्तदन्तिनः।।4।। (वृत्तम् – अनुष्टुप, स्रोत: – हितोपदेशः।)

अनुवादः

लहानसहान वस्तूंचा संघ कार्य यशस्वी करतो (पूर्णत्वास नेतो). गवतापासून बनविलेल्या दोरखंडाने मत्त हत्ती (सुद्धा) नियंत्रित केले जातात.

श्लोकः 6

प्रथमवयसि पीतं तोयमल्पं स्मरन्तः
शिरसि निहितभारा नारिकेला नराणाम्।
ददति जलमनल्पास्वादमाजीवितान्त।
न हि कृतमुपकारं साधवो विस्मरन्ति ।।6।। (वृत्तम् – मालिनी, स्रोत: – विक्रमचरितम्।)

सन्धिविग्रहः

1. तोयमल्पम् – तोयम् + अल्पम्।
2. कृतमुपकारम् – कृतम् + उपकारम्।
3. साधवो विस्मरन्ति – साधवः + विस्मरन्ति।
4. जलमनल्पास्वादमाजीवितान्तम् – जलम् + अनल्पास्वादम् + आजीवितान्तम्।
5. निहितभारा नारिकेला नराणाम् – निहितभारा: + नारिकेला: + नराणाम्।

अन्वय:- प्रथमवयसि पीतम् अल्पं तोयं स्मरन्तः शिरसि निहितभारा: आजीवितान्तं नराणां (नरेभ्यः) अनल्पास्वाद जलं ददति। साधवः कृतम् उपकारं नहि विस्मरन्ति।

अनुवादः

नारळाचे झाड लहानपणी मिळालेले थोडे पाणी लक्षात ठेवून, नारळांचे ओझे डोक्यावर बाळगून माणसांना आजन्म भरपूर गोड पाणी देते. (जसे) दुसऱ्याने केलेले उपकार सज्जन लोक कधीही विसरत नाहीत. (त्याची अनेक पटीने परतफेड करतात.)

श्लोक: 7

घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद्रासभरोहणम्।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ।।7।। (वृत्तम – अनुष्टुप, प्रकार: – हास्योक्तिः )

सन्धिविग्रहः

1. कुर्याद्रासभरोहणम् – कुर्यात् + रासभरोहणम्।
2. पुरुषो भवेत् . पुरुषः + भवेत्।

अन्वयः- पुरुषः घटं भिन्द्यात्, पटं छिन्द्यात, रासभरोहणं (अपि) कुर्यात्। येन केन प्रकारेण (सः) प्रसिद्धः भवेत्।

अनुवादः

घडा (भांडी) फोडावा, कपडे फाडावेत, गाढवावर (देखील) बसावे, पण काही तरी करून मनुष्याने प्रसिद्ध व्हावे.

शब्दार्थाः

1. रूपमधिकम् – more than beauty – रूपाहून अधिक
2. प्रच्छन्नगुप्तम् – secretly hidden – गुप्त/लपविलेले
3. भोगकरी – brings pleasure – आनंद / समाधान प्राप्त करून देणारे
4. सुखकरी – gives happiness – सुख देणारे
5. गुरूणाम् – of preceptors – गुरूंचे
6. बन्धुजनः – relative – नातेवाईक
7. विदेशगमने – when travelled in foreign land परदेशी प्रवास केला असता
8. परं दैवतम् – supreme deity – सर्वश्रेष्ठ दैवत
9. राजसु – among kings – राजांमध्ये
10. विद्याविहीन: – devoid of knowledge – विद्याहीन, ज्ञानहीन
11. निन्दन्तु – may censure – निंदानालस्ती करो
12. नीतिनिपुणाः – expert in ethics – नीतिमध्ये कुशल
13. स्तुवन्तु – may praise – स्तुती करो
14. समाविशतु – may come – येवो
15. यथेष्टम् – as per will – स्वेच्छेने
16. अद्यैव – today itself – आजच
17. युगान्तरे – in another era – युगानंतर (दुसऱ्या युगात)
18. न्याय्यात्पथ: – from the path of justice – न्याय्यमार्गावरून
19. प्रविचलन्ति – deviate – ढळतात
20. धीराः – courageous – धैर्यवान
21. भुजगयमिता: – controlled by serpants – सापांनी नियंत्रित
22. निरालम्बः – unsupported – निराधार
23. चरणविकल: – lame by a leg – पायाने पंगु
24. सारथिः – charioteer – सारथी
25. अन्तं याति – goes to the end – शेवटपर्यंत जातो
26. अपारस्य नभसः – of the endless sky – अनंत आकाशाच्या
27. क्रियासिद्धिः – accomplishment of the task – कार्याची पूर्तता
28. उपकरणे – on the means – साधनांवर
29. प्रथमवयसि – in early age – लहानपणी
30. तोयम् – water – पाणी
31. निहितभाराः – bearing weight – वजन घेऊन

https://www.evidyarthi.in/

32. आजीवितान्तम् – throughout life – संपूर्ण आयुष्यभर
33. अनल्पास्वादम् abundant of sweet water – भरपूर प्रमाणात गोड पाणी
34. उपकारम् – favour/benevolence – उपकार
35. अल्पनाम – of small (insignificant) things – लहानसहान गोष्टींचा
36. संहतिः – unity / union – संघ
37. कार्यसाधिका – that which accomplishes the task – कार्य साधणारी
38. गुणत्वम् – collection of a rope – दोरखंड
39. तृणैः – by grasses – गवतापासून बनविलेले
40. बध्यन्ते – can control – बांधले जातात/नियंत्रित केले जातात
41. घटम् – a pot – घडा
42. भिन्द्यात् – should break – फोडावा
43. पटम् – a cloth – वस्त्र
44. छिन्द्यात् – should tear – फाडावे
45. रासभरोहणम् – should ride – गाढवावर बसावे
46. कुर्यात् – adonkey
47. येन केन प्रकारेप – by hook or crook – काहीतरी करून
48. प्रसिद्धः भवेत् – should become famous – प्रसिद्ध व्हावे
49. आत्मनः – own – स्वत:च्या
50. मुखदोषेण' – due to fault of mouths – तोंडाच्या दोषाने (आवाजामुळे)
51. बध्यन्ते – caged/trapped – अडकले जातात
52. शुकसारिकाः – parrots and mynas – पोपट व साळुक्या/मैना
53. बकाः – cranes – बगळे
54. मौनम् – silence – मौन
55. सर्वार्थसाधनम् – instrument of achieving all purposes – सर्व हेतू प्राप्त करण्याचे साधन